RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ३, अंक ४७] शुक्रवार, सप्टेंबर १, २०१७/भाद्र १०, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ७४

## प्राधिकृत प्रकाशन

### शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

**नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रातील २०१ गावांचा सुधारित प्रारूप अंतरिम विकास आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये जनतेच्या माहितीस्तव प्रसिद्ध करणे.**

### सूचना

क्रमांक सिडको /नैना/अमुनि/बी.एन./२४/२०१७

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम, १९६६) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ४० (१) ब द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक १० जानेवारी २०१३, क्रमांक टी.पी.एस. १७१२/४७५/प्र.क्र. १८/१२/नवि-१२ च्या अधिसूचनेअन्वये २७० गावांच्या क्षेत्राकरिता नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त क्षेत्र " असा करण्यात आला आहे) करिता शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासन नियंत्रित व मालकीची कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त क्षेत्राकरिता विकास आराखडा तयार करण्याचा इरादा घोषित करण्यासाठी दिनांक १५–२१ मे २०१४, गुरुवार-बुधवार भाग २ च्या महाराष्ट्र शासन **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिवसापासून साठ (६०) दिवसांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीत सूचना व हरकती प्राप्त करण्यासाठी नोटीस प्रसिद्ध करण्यात आली ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २२ सप्टेंबर २०१५ च्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लिमिटेड (एम.आय.डी.सी.) तसेच दिनांक १७ फेब्रुवारी २०१६, दिनांक १८ मार्च २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एम.एस.आर.डी.सी.) यांची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केल्यानंतर नैना प्राधिकरणाचे उक्त क्षेत्र २२४ गावांपुरते मर्यादित झाले ;

आणि ज्याअर्थी, विशेष नियोजन प्राधिकरण नैना प्रकल्पातिल २३ गावांचा अंतरिम विकास आराखडा तयार करून उक्त अधिनियमांतर्गत असलेल्या प्रक्रिया करून प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस पाठविला. महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदी अंतर्गत दिनांक २४ एप्रिल २०१७ च्या अधिसूचना क्र.टी.पी.एस. क्र. १२१५/२४५/-३३२/२०१६/-१२ अन्वये सदर अंतरिम विकास आराखड्यास मंजुरी दिली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ व २५ मधील तरतुदींनुसार नगररचना अधिकारी यांची नियुक्ती व उक्त क्षेत्राकरिता अस्तित्वातील भूवापर नकाशा अनुक्रमे तयार करण्यात आलेत ;

आणि ज्याअर्थी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक २७ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ११७२९ अन्वये उक्त क्षेत्रातील २०१ गावांचा प्रारूप विकास आराखडा तसेच २२४ गावांकरिता प्रारूप विकास नियंत्रण व प्रचारक नियमावली आणि अहवाल उक्त अधिनियमाच्या २६ (१) अन्वये जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी मंजूर करण्यात आला. या प्रमाणे महाराष्ट्र शासन भाग दोन क्र. ५४, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ असाधारण **राजपत्रात** नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. सदर नोटीस स्थानिक वर्तमानपत्रातसुद्धा प्रसिद्ध करण्यात आली ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठित केलेल्या नियोजन समितीने प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात प्रसिद्ध केलेल्या नोटीसच्या अनुषंगाने जनतेकडून प्राप्त सूचना व हरकतीवर सुनावणी देण्यात आली ;

आणि ज्याअर्थी, प्रारूप विकास आराखड्यासंदर्भात प्रसिद्ध नोटीसच्या अनुषंगाने विहित कालावधीतील सूचना व हरकतीचा नियोजन समितीने त्यांच्या अहवाल शिफारशीसह दिनांक २८ जुलै २०१७ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम २८ (३) च्या तरतुदीप्रमाणे विशेष नियोजन प्राधिकरण नैनास सादर करण्यात आला ;

आणि ज्याअर्थी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ११९०४ अन्वये नियोजन समितीने सादर केलेल्या अहवाल शिफारशी स्वीकृत केल्यात. त्यानुसार ' प्रारूप विकास आराखडा ' ' प्रारूप विकास नियंत्रण व प्रचारक नियमावली ' तसेच ' प्रारूप विकास आराखडा अहवाल ' यामध्ये सुधारणा करण्यात आल्यात.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) मधील तरतुदीनुसार सुधारित प्रारूप विकास आराखडा, सुधारित प्रारुप विकास नियंत्रण व प्रचारक नियमावली, सुधारित प्रारूप विकास आराखडा अहवाल, सुधारणेच्या यादीसह अतिरिक्त मुख्य नियोजनकार (नैना), ८ वा मजला, टॉवर क्र. १० बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ यांच्या कार्यालयात दुपारी २ ते ४ या कालावधीत कार्यलयीन वेळेत उपलब्ध आहे. सदर सुधारणेची यादी सिडकोच्या *https://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx* या संकेत स्थळावरसुद्धा उपलब्ध आहे.

उपरोक्त सुधारित प्रारूप विकास आराखडा, सुधारित प्रारूप विकास नियंत्रण व प्रचारक नियमावली, सुधारित प्रारूप विकास आराखडा अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये तरतुदीनुसार फक्त जनतेच्या माहितीस्तव आहे.

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**डी. आर. भदे,**
नगररचना अधिकारी (नैना).

नोंदणीकृत कार्यालय :
निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१,
दिनांक १ सप्टेंबर २०१७.

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.

### Publication of Modified Draft Development Plan of 201 villages in Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) under Section 28(4) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

### Notice

No. CIDCO/NAINA/ACP/BN-24/2017

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of the powers conferred under clause (*b*) of sub-section (*1*) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS-1712/475/CR-98/12/ UD-12, dated 10th January 2013 (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for 270 villages (hereinafter referred to as "said notified area") as Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) as specified therein;

And whereas, in pursuance of the powers conferred by sub-section (*1*) of the Section 23 of the said Act, the Corporation published notice declaring its intention to prepare Development Plan for the said notified area, and inviting suggestions or objections from the public within a period of not less than sixty days from the publication of this notice in the *Maharashtra Government Gazette,* Part-II, Thursday to Wednesday, dated 15-21 May, 2014;

And whereas, the Government of Maharashtra *vide* notifications dated 22nd September, 2015 declared Maharashtra Industrial Development Corporation Limited (MIDC) and *vide* notification dated 17th February 2016, 18th March 2016 declared Maharashtra State Road Development Corporation Limited (MSRDC) as SPA, resulting CIDCO's Jurisdiction as SPA limited to 224 villages;

And whereas, the Government of Maharashtra had sanctioned the Interim Development Plan for 23 villages under provision of Section 31(*1*) *vide* Notification No. TPS-1215/245/CR-332/ 2016/SM/UD-12, dated 27th April 2017;

And whereas, in pursuance of the powers conferred by Section 24 and Section 25 of the said Act, appointed TPO and the Corporation has prepared Existing Land Use map for land of said area respectively;

And whereas, CIDCO Board *vide* Resolution No. 11729, dated 27th October, 2016 approved Draft Development Plan, Draft Development Plan Report for 201 villages and Draft Development Control and Promotion Regulations for 224 villages for publication and inviting Suggestions and Objections in accordance with Section 26(*1*) of the said act and accordingly notice was published in *Government Gazette* on 7th November, 2016 and also in local newspapers inviting Suggestions and Objections from the general public;

And whereas, Planning Committee constituted on dated 24th January, 2017 under Section 28(*2*) of the said Act and completed the task of hearing on Suggestions and Objections submitted by general public under Section 26(*1*) of the said Act;

And whereas, as stipulated in the said Act, after considering the Suggestions and Objections to the said Draft Development Plan received, the Planning Committee has submitted report along with their recommendations on 28th July, 2017 to the SPA under provision of Section 28 (*3*) of the said Act;

And whereas, the CIDCO Board *vide* Resolution No. 11904, dated 11th August, 2017 accepted the report/recommendations of the Planning Committee. Accordingly, modifications in the "Draft Development Plan", "Draft Development Control and Promotion Regulations" and "Report" have been carried out as recommended by Planning Committee.

Now, therefore, in accordance with sub-section (*4*) of the section 28 of the said Act, the "Modified Draft Development Plan", "Modified Draft Development Plan Report", " Modified Draft Development Control and Promotion Regulations" are available for information at the office of Additional Chief Planner (NAINA), CIDCO at 8th Floor, Tower 10, Belapur Railway Station Complex, CBD-Belapur, Navi Mumbai 400 614, between 02-00 pm to 04-00pm on all working days. Copy of the notice along with list of modifications are also uploaded on CIDCO's website *https://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx*

The above modified Draft DP, Report and DCPRs are only for the information of public as per the provision of Section 28 (*4*) of the said Act.

By the order of Board of Directors of the Corporation.

D. R. BHADE,

Town Planning Officer (NAINA).

*Regd. Office :*
Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai 400 021.
Dated 1st September, 2017.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.